Rayat Shikshan Sanstha's

# Chandrabai-Shantappa Shendure College, Hupari

## Department of Sociology

**Report on 2025-26**

## Environmental Awareness Program

Date- 3/09/2025

Department of Sociology and IQAC organized Environmental Awareness Program to promote the celebration of an eco-friendly Ganesh festival. As part of this initiative, Head of Department, faculty members and students of the Department visited Chandinagarcha Raja Ganesh Mandal, Gajavkra Ganesh Mandal and Omkar Ganesh Mandal, Rendal and distributed pamphlets highlighting the importance of environmental conservation during the festival.

This initiative by the Department of Sociology reflects not only academic engagement but also a strong sense of social responsibility. By spreading eco-friendly messages through direct community participation, the department has set a meaningful example of how educational institutions can contribute to sustainable social practices. The program was conducted under the valuable guidance of Prin. Prof. (DR.) Padalkar V.V. IQAC Coordinator Prof. Tulshekatti D.C. The wholehearted support of all faculty members of the department was instrumental in the successful completion of this initiative.

**Outcomes:**

- To create awareness among local Ganesh Mandal celebrating an eco-friendly festival.
- To developed students sense of social responsibility







Head
Department of Sociology
C.S S College Hupari

Chandrabai-Shantappa Shendure College, Hupari

Principal
Chandrabai-Shantappa Shendure College
Hupari.

रयत शिक्षण संस्थेचे,

## चंद्राबाई शांताप्पा शेंडुरे कॉलेज, हुपरी

## समाजशास्त्र विभाग व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष आयोजित

# पर्यावरणपूरक गणेशोत्सव २०२५-२६

गणेश उत्सव हा महाराष्ट्रासह संपूर्ण भारतातील सर्वात मोठा, लोकप्रिय आणि लोकशाही स्वरूपात साजरा होणारा सण आहे. या सणाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे लोक सहभाग, सामूहिक आनंद, सांस्कृतिक कार्यक्रम आणि सामाजिक उपक्रम यांचा सुंदर संगम. मात्र, या उत्सवाच्या धामधुमीत गेल्या काही दशकांत प्रदूषण, संसाधनांचा अपव्यय आणि पर्यावरणावर होणारे दुष्परिणाम यांकडे दुर्लक्ष झाले आहे.आजच्या काळात पर्यावरणपूरक सण ही काळाची गरज आहे. तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून आपण उत्सवाला अधिक सुंदर, आकर्षक आणि पर्यावरणास हितकारक बनवू शकतो. त्यासाठी एलईडी लाइटिंग, मातीच्या मूर्ती, ध्वनी प्रदूषण नियंत्रण, पाण्याची बचत, स्वच्छता अभियान, वृक्षारोपण, सामाजिक उपक्रम यांचा समावेश करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. आपण आज जर पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा केला, तर भविष्यातील पिढ्यांसाठी एक हरित आणि सुंदर भारत घडवू शकतो. पण आज लेझर लाइट वापरण्याकडे सर्वांचा कल दिसून येतो. त्याचे अनेक दुष्परिणाम आपणास पहावयास मिळतात.

लेझर लाइटचे दुष्परिणाम

### १) आरोग्यावर परिणाम

- **डोळ्यांवर दुष्परिणाम –** लेझर किरणे थेट डोळ्यांवर गेल्यास डोळ्यांचे पडदे (Retina) जळण्याचा धोका असतो.
- **डोकेदुखी व माइग्रेन –** जास्त वेळ लेझर किरणांकडे पाहिल्यास डोकेदुखी, डोळ्यांत ताण निर्माण होतो.
- **त्वचेला त्रास –** जास्त शक्तीच्या लेझरमुळे त्वचेवर जळजळ होऊ शकते.

### २) प्राणी व पक्ष्यांवर परिणाम

- लेझर प्रकाशामुळे पक्ष्यांचा दिशाभ्रम होतो, त्यांची दृष्टी तात्पुरती कमी होते.
- काहीवेळा रात्रीचे प्राणी घाबरतात व अस्वस्थ होतात.

### ३) पर्यावरणीय परिणाम

- जास्त प्रमाणात लेझर शोमुळे रात्रीचा नैसर्गिक अंधार (Dark Sky) नष्ट होतो.
- यामुळे प्रदूषणाचा एक नवीन प्रकार – प्रकाश प्रदूषण (Light Pollution) निर्माण होतो.

४) सामाजिक दुष्परिणाम

- लेझर शोमध्ये आकर्षण जास्त असल्यामुळे काही वेळा ध्वनीप्रदूषण, गर्दी व अपघाताचा धोका वाढतो.

यासाठी आपण आकर्षणासाठी लेझर, पण मर्यादित वापर, लेझर थेट न वापरणे , लेझरचा मोह टाळून पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करणे आणिआरोग्य जोपासून निसर्ग वाचवणे शाडू माती किंवा नैसर्गिक गाळाची मूर्ती वापरून जलप्रदूषण कमी करणे, डीजे, साऊंड सिस्टीमवर मर्यादा, पारंपरिक ढोल-ताशा, सांस्कृतिक कार्यक्रमांना प्राधान्य, ध्वनीची मर्यादा रात्री १० नंतर न ओलांडणे, घरगुती विसर्जनासाठी कृत्रिम तलावाचा वापर इ. वापर करूशकतो.

**समाजशास्त्र विभागप्रमुख** **प्राचार्य**

चंद्राबाई शांताप्पा शेंडरे कॉलेज. हुपरी